# महेश सहकारी बँक लि.,पुणे

मुख्य कार्यालय: ३७२/७३/७४, श्री छत्रपती शिवाजी मार्केटयार्ड, गुलटेकडी, पुणे-४११ ०३७. दूरध्वनी क्रमांक : २४२६३३४१/४२/४३
Website: www.maheshbankpune.in E-mail: msbl@maheshbankpune.in

## वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

### फक्त सभासदांसाठी

महेश सहकारी बँक लि.,पुणे या बँकेची ५० वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार, दि.२४/०९/२०२२ रोजी सकाळी १०.३० वाजता महेश सांस्कृतिक भवन, स.नं. ६२, २बी, कोंढवा, पुणे ४११०४८ येथे खालील विषयांवर कामकाज करण्यासाठी भरणार आहे. तरी सर्व सभासदांनी सभेस उपस्थित रहावे ही विनंती.

१. मागील वर्षी दिनांक २६.०९.२०२१ रोजी ऑनलाईन पद्धतीने झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा इतिवृत्तांत वाचून कायम करणे.

२. संचालक मंडळाचा बँकेच्या कार्याबद्दलचा वर्षअखेरचा अहवाल व लेखापरिक्षण झालेल्या दिनांक ३१ मार्च २०२२ अखेर संपलेल्या वर्षाचे नफातोटा पत्रक व ताळेबंद स्वीकृत करणे.

३. सन २०२१-२२ साठीच्या मा.संचालक मंडळाने कायदा, नियम व उपविधी यास अनुसरून केलेली नफा वाटणी स्वीकृत करणे.

४. सन २०२२-२३ करीता संचालक मंडळाने तयार केलेले अंदाजपत्रक आणि प्रगतीचा तक्ता स्वीकृत करणे.

५. सन २०२१-२२ चा वैधानिक लेखापरिक्षण अहवाल व सन २०२०-२१ चे वैधानिक लेखापरिक्षण दोषदुरूस्ती अहवालाची नोंद घेऊन स्वीकृत करणे.

६. सन २०२१-२२ या सालासाठी मागील वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये मा.वैधानिकलेखापरिक्षकांची नियुक्ती व मानधन ठरविणे याबाबतचे निर्णयानुसार मा.संचालक मंडळाने केलेल्या कार्यवाहीस मान्यता देणे.

७. आर्थिक वर्ष सन २०२२-२३ करिता वैधानिक लेखापरिक्षक नेमणूक व त्यांस द्यावयाचे मानधन याबाबत रिझर्व्ह बँकेने केलेल्या निर्देशास अधिन राहून संचालक मंडळाने केलेल्या शिफारसीस मान्यता देणे.

८. दिनांक ३१.०३.२०२२ अखेर संचालक मंडळ सदस्य व त्यांचे नातेवाईकांना दिलेल्या कर्जाबाबत माहिती घेणे.

९. महाराष्ट्र शासनाच्या नागरी सहकारी बँकांसाठी एकरकमी कर्ज परतफेड योजना, शासन निर्णयानुसार दि.३१.०३.२०२२ पर्यंत तडजोड केलेल्या थकित कर्ज खात्यांच्या माहितीची नोंद घेणे.

१०. सहकार खात्याने मंजूर केलेल्या पोटनियम दुरूस्तीस रिझर्व्ह बँकेने सुचविलेले बदल/सुधारणा यांस मान्यता देणे.

११. सेवकांची रचना व नेमणुकीस मान्यता देणे.

१२. अहवाल वर्षात सहकार खात्याने मागविलेल्या माहितीची नोंद घेणे.

१३. सन २०२२-२३ करीता बँकेच्या सभासदांचे शिक्षण व प्रशिक्षणाचे संदर्भात चर्चा करणे.

१४. मा. संचालक मंडळाचे आगामी निवडणूकीबाबत माहिती घेऊन नोंद घेणे.

१५. मा.अध्यक्षांचे पूर्वपरवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयांवर विचार विनिमय करणे.

मा.संचालक मंडळाच्या आज्ञेवरून,

Sd/-

(एस.आर.करवा)
मुख्य कार्यकारी अधिकारी

स्थळ: पुणे
दिनांक: १४.०७.२०२२

**सूचना:**

१) गणसंख्ये अभावी (कोरम किमान २००) सभा तहकूब झाल्यास सदरची सभा त्याच दिवशी, त्याच ठिकाणी ठरलेल्या वेळेच्या अर्धा तासानंतर घेण्यांत येईल व अशा सभेस गणपूर्तीची आवश्यकता राहणार नाही.

२) बँकेचे लेखापरिक्षित नफा-तोटा पत्रक, ताळेबंद व संचालक मंडळाचा अहवाल बँकेचे मुख्यकार्यालय व सर्व शाखा कार्यालयांमध्ये उपलब्ध आहे, तो सभासदांनी सदर कार्यालयांतून पोहोच देऊन घ्यावा अथवा आपणांस तो पोस्टाने हवा असल्यास तसे मागणीचे लेखी पत्र मुख्यकचेरीस पाठवावे. त्यानुसार सभासदाचे बँकेत नोंदविलेल्या पत्त्यावर अहवाल पाठविला जाईल.

३) वार्षिक सर्वसाधारण सभेच्या वरिल नोटीस बाबत अधिक स्पष्टीकरण हवे असल्यास तसे पत्र दिनांक १७/०९/२०२२ पूर्वी बँकेच्या मुख्यकार्यालयाकडे कार्यालयीन कामकाजाचे वेळेत पाठवावे.